*बोन्साय कलेच्या संवर्धनासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल - सुधीर मुनगंटीवार*

*प्राजक्ता काळे यांना गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड तर्फे विश्व विक्रमासाठी प्रमाणपत्र प्रदान*.
==============================================================

श्रीमती प्राजक्ता काळे यांनी बोन्साय कलेच्या माध्यमातुन पुणे शहराचा नावलौकीक राज्य, देश तसेच जागतीक पातळीवर वाढविला आहे. बोन्साय म्हणजेच वामनवृक्ष्. ही मुळ कला भारतीय आहे. मात्र इतर कलांप्रमाणे तिचे जतन झाले नाही. भारतात शुन्य आयात आणि शंभर टक्के निर्यातीत मोठा सहभाग हे ध्येय साध्य करण्यासाठी अशा पध्दतीच्या प्रयत्नांची गरज असल्याचे प्रतिपादन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

पुणे येथे गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये विक्रमाची नोंद करणा-या प्राजक्ता काळे यांच्या सत्कार कार्यक्रमात वनमंत्री सुधीर मुनगंटीवार बोलत होते. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले, श्रीमती प्राजक्ता काळे यांचे बोन्साय प्रदर्शन हे अप्रतिम हा शब्द सुध्दा कमी पडावा इतके सुंदर आहे. धन हे माणसाच्या शेवटच्या श्वासापर्यंत कामी येते. पण वन हे पुढील जन्माच्या पहिल्या श्वासासाठी कामी येते. असे सांगत बोन्साय कलेच्या संवर्धनासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल अशी ग्वाही त्यांनी यावेळी बोलताना दिली.

या कार्यक्रमाला वनविभागाचे सचिव विकास खारगे, सामाजिक वनीकरणाचे प्रधान मुख्य संरक्षक अनुराग चौधरी, मुख्य वनसंरक्षक विवेक खांडेकर, प्रतापराव पवार, विठ्ठलशेठ मनियार, गिरीधारी काळे, डॉ. के. एस. संचेती, उद्योग विभागाचे उपसचिव संजय इंगळे, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे ऋषीनाथ मेहता, रंगनाथ नाईकडे, श्रीलक्ष्मी ए. आदींची उपस्थिती उपस्थिती होती.

एकाच व्यक्तीने एकाच ठिकाणी बोन्सायची 3333 झाडे लावण्याच्या विक्रमाची नोंद श्रीमती प्राजक्ता गिरीधारी काळे यांनी केल्याबद्दल वित्त व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते त्यांना गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र देवून त्याचा सत्कार करण्यात आला. गेल्या 35 वर्षांच्या अथक परिश्रमानंतर विविध वृक्षांच्या सुमारे 150 प्रजाती श्रीमती काळे यांनी विकसित केल्या. त्या निमीत्ताने गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या वतीने पाहणी करून आज निर्णय जाहीर करण्यात आला.

प्राजक्ता काळे यांनी समर्पण आणि त्याच्या भावनेतुन बोन्साय कला जोपासली. मुंबई सारख्या महानगरांमध्ये बोन्साय कलेसाठी मोठी संधी आहे. यातुन रोजगारही निर्माण होवून शकते. महिलांना प्रशिक्षण दिल्यास यातुन रोजगार प्राप्ती होवू शकते असे प्रतिपादन वनविभागाचे सचिव विकास खारगे यांनी केले. यावेळी मान्यवरांची शुभेच्छापर भाषणे झालीत.